# २. बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना क्षेत्रांतर्गत (टिएसपी) /क्षेत्राबाहेरील(ओटिएसपी)

**योजनेचे उदेश** :-- अनुसुचित जमातीतील उत्पन्न वाढवुन त्यांचे जीवनमान उंचवण्यासाठी शेतीविषयक बाबींचे १०० टक्के अनुदानावर खालील विविध बाबींचा लाभ देवुन लाभार्थींचा आर्थिक स्तर उंचावणे.

**लाभाचे स्वरुप** :--

| अ.क्र. | बाब | अनुदान रु. | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | नविनविहीर | २,५०,००० | १०० |
| २ | जुनी विहीर दुरुस्ती | ५०,००० | १०० |
| ३ | इनवेल बोरिंग | २०,००० | १०० |
| ४ | विज जोडणी आकार | १०,००० | १०० |
| ५ | शेततळयांचे प्लास्टीक अस्तरीकरण | १,००,००० | १०० |
| ६ | सुक्ष्म सिंचन संच<br>अ. ठिबक संच<br>ब. तुषार संच | <br>५०,०००<br>२५,००० | ९० |
| ७ | परसबाग | ५०० | १०० |
| ८ | पंप संच (डिझेल/विद्युत/सोलर) | २०००० (१० अश्वशक्ती पर्यंतचे विद्युत पंप संच करीता) | १०० |
| ९ | पीव्हीसी पाईप | ३०००० ( ६०० मी.पाईप्सच्या मर्या.) | १०० |

**लाभार्थी निवडीचे निकष** - या योजनेंतर्गत लाभार्थी निवडीसाठी अनुसुचित जमातीतील शेतक-यांकडे **नविन विहिरींसाठी किमान ०.४० हे.व नविन विहीर व्यतिरिक्त इतर घटकांच्या लाभासाठी किमान ०.२० हे.शेतजमीन** आणि योजनेंतर्गत सर्व बाबींसाठी **कमाल मर्या.६.०० हे** आहे. तसेच आदिवासी शेतक-यांच्या जमिनी दुर्गम भागात व विखंडित असल्याने ०.४० हे.पेक्षा कमी जमीन धारणा असलेले दोन किंव अधिक लाभार्थी एकत्र आल्यास त्यांची एकत्रित जमीन किमान ०.४० हे इतकी होत असल्यास त्यांनी करार लिहुन दिल्यास त्यांना योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील.

**योजनेचा लाभ घेण्यासाठी लागणारी आवश्यक कागदपत्र :--**

१)ऑनलाईन अर्ज (www.mahadbtmahait.gov.in),
२) स्वतःचे नांवे, ७/१२ उतारा व ८ अ उतारा, ड-पत्रक (नगरपंचायत,नगरपालिका व महानगरपालीका क्षेत्रांबाहेरील)
३) म. तहसिलदार / प्रांत अधिकारी यांचा अनुसुचित जमातीचा जातीचा दाखला (सत्यप्रत)
४) म.तहसिलदार यांचा मागिल वर्षाचा उत्पन्नाचा दाखला (रु.१,५०,०००/- मर्यादेत)
५) आधारकार्ड
६) आधारलिंक बँक खाते .
७) वैयक्तिक वन हक्क पटटेधारक असल्यास वनपटेधारक सक्षम प्राधिकारी दाखला.
८) ७/१२ उताऱ्यावर इत्तर हक्कदार असतील तर त्यांचे  कार्यकारी दंडाधिकारी समक्षचे संमतीपत्र १००/- च्या स्टॅम्पवर
९) ) १ मे २००१ नंतर ३ रे अपत्य झालेले नसल्याबाबतचा ग्रामसेवकाने दिलेला दाखला.
१०) रेशनकार्ड झेरॉक्स
११) ग्रामसभा ठराव.

. **योजनेचा लाभ घेण्यासाठी कोणाकडे संपर्क साधावा** :- कृषि विभाग, संबंधित पंचायत समिती